महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

# महाराष्ट्र सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५६

# मुंबई राज्य पोलीस कमिशनर अधिनियम, १९५९

(३ जुलै, २००६ पर्यंत सुधारित)

## Bombay Act No. LVI of 1959

# The Bombay State Commissioners of Police Act, 1959

*(As modified upto 3rd July, 2006)*

✻

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, कोल्हापूर यांच्याकडून भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याकडून प्रकाशित

२००६

[किंमत रु. ४-००]

# मुंबई राज्य पोलीस कमिशनर अधिनियम, १९५९

अनुक्रमणिका


उद्देशिका

| कलमे | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. | .. .. .. | १ |
| २. | व्याख्या. | .. .. .. | १ |
| ३. | अधिनियमांची सुधारणा; कोणत्याही अधिनियमान्वये पोलीस कमिशनरवर अधिकार सोपविण्याचा व कर्तव्ये लादण्याचा राज्य शासनाचा अधिकार. | .. | २ |
| ४. | पोलीस अधीक्षक याने आणि जिल्हा फौजदारी न्यायाधिशाचे अधिकार, त्याऐवजी पोलीस कमिशनरकडे सोपविले असतील त्याबाबतीत, जिल्हा फौजदारी न्यायाधिशाने केलेल्या विद्यमान नेमणुका, अधिसूचना वगैरे पोलीस कमिशनरने केल्या आहेत असे समजणे. | .. | ३ |
| ५. | विद्यमान विधीतील जिल्हा पोलीस अधीक्षकाच्या उल्लेखांचा अर्थ लावणे. | .. .. | ३ |
| ६. | लेखातील किंवा कागदपत्रातील पोलीस अधीक्षकाच्या व जिल्हा फौजदारी न्यायाधिशाच्या उल्लेखांचा अर्थ लावणे. | .. | ३ |
| ७. | पोलीस अधीक्षक व जिल्हा फौजदारी न्यायाधीश याजपुढील अनिर्णीत कामकाज. | .. | ३ |
| ८. | अनिर्णीत असलेले वैध कामकाज. | .. .. .. | ४ |
| ९. | अडचणी निवारण करण्याचा अधिकार. | .. .. .. | ४ |

## सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५६[१]

# [मुंबई राज्य पोलीस कमिशनर अधिनियम, १९५९]

(१४ ऑक्टोबर, १९५९)

महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६९ याद्वारे अनुकूलन व फेरबदल करण्यात आले.

१९६२ चा महाराष्ट्र ४६ याद्वारे सुधारणा करण्यात आली.

**मुंबई राज्यात बृहन्मुंबईबाहेर कोणत्याही क्षेत्रासाठी पोलीस कमिशनरची नेमणूक केल्यानंतर तदनुषंगिक गोष्टींसाठी तरतूद करण्याबाबत अधिनियम.**

**ज्याअर्थी,** मुंबई राज्यात बृहन्मुंबईबाहेर कोणत्याही क्षेत्रासाठी पोलीस कमिशनरची नेमणूक केल्यानंतर तदनुषंगिक गोष्टींची तरतूद करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या दहाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :--

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई राज्य पोलीस कमिशनर अधिनियम, १९५९, असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण [२][महाराष्ट्र राज्यास] लागू आहे.

(३) तो, राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे जी तारीख नेमील त्या तारखेस अंमलात येईल.

व्याख्या.

**२.** या अधिनियमात, संदर्भावरून अन्यथा अर्थ लावणे आवश्यक नसेल तर,--

(क) "पोलीस कमिशनर" या संज्ञेचा अर्थ, राज्य शासनाने मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ अन्वये [२][महाराष्ट्र राज्यात], बृहन्मुंबईबाहेर कोणत्याही क्षेत्रासाठी नेमलेला पोलीस कमिशनर, असा आहे व तीत, पोलीस कमिशनरच्या आदेशान्वये त्याचे कोणतेही अधिकार चालवीत असेल व कर्तव्ये बजावीत असेल असा ॲडिशनल पोलीस कमिशनर व डेप्युटी पोलीस कमिशनर [३]* * * याचा समावेश होतो.

१९५१ चा मुंबई २२

(ख) "विद्यमान विधि" या संज्ञेचा अर्थ, भारताच्या संविधानाच्या सातव्या अनुसूचीतील सूची २ व ३ यात, निर्दिष्ट केलेल्या बाबींविषयी विधानमंडळाने किंवा इतर सक्षम प्राधिकाऱ्याने अधिनियमित केलेला व हा अधिनियम अंमलात येण्यापूर्वी *मुंबई राज्याच्या [४][दि. १ मे, १९६० रोजी महाराष्ट्र राज्याच्या कोणत्याही भागात अंमलात असलेला] कोणताही अधिनियम, असा आहे आणि तीत, अशा कोणत्याही अधिनियमान्वये केलेला कोणताही नियम, उपविधी, विनियम, आदेश किंवा योजना यांचा अथवा अशा अधिनियमान्वये काढलेली कोणतीही अधिसूचना किंवा त्या अन्वये विहित केलेला कोणताही नमुना किंवा ज्यास कायद्याचे पाठबळ असेल असा इतर लेख यांचा समावेश होतो.

---

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी मुंबई शासकीय राजपत्र, १९५०, भाग पाच, पृ. ५९७ पहा.

[२] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५० याद्वारे "मुंबई राज्य" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम ३, अनुसूची याद्वारे "सहायक पोलीस आयुक्त" हा मजकूर वगळण्यात आला.

[४] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० याद्वारे हा भाग समाविष्ट करण्यात आला.

* "मुंबई राज्य" या मजकुरात फेरबदल करण्यात आला नाही. (वरील आदेश पहा.)

(ग) "तत्काली अंमलात असलेला कोणताही विधि" या संज्ञेचा अर्थ, भारताच्या संविधानाच्या सातव्या अनुसूचीतील सूची २ व ३ यांत क्रमशः निर्दिष्ट केलेल्या बाबीसंबंधी असलेला व [1][महाराष्ट्र राज्यात] तत्काली अंमलात असेल असा कोणताही विधि, असा आहे ;

(घ) "अनुसूची" या संज्ञेचा अर्थ, या अधिनियमास जोडलेली अनुसूची, असा आहे.

अधिनियमांची सुधारणा; कोणत्याही अधिनियमान्वये पोलीस कमिशनरवर अधिकार सोपविण्याचा व कर्तव्ये लादण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

**३.** (१) पोलीस कमिशनरास अधिकार प्रदान करण्यासाठी व त्याजवर कर्तव्ये लादण्यासाठी व इतर विवक्षित कारणांसाठी, अनुसूचीच्या स्तंभ १ मध्ये निर्दिष्ट केलेले अधिनियम हे, त्या अनुसूचीचा स्तंभ २ यात निर्दिष्ट केलेल्या रीतीने आणि त्या मर्यादेपर्यंत सुधारण्यात येत आहेत.

(२) अनुसूची अन्वये सुधारण्यात आलेला मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ याखाली नेमलेल्या पोलीस कमिशनरने, १९५१ चा मुंबई २२ इलाखा शहराच्या किंवा बृहन्मुंबईच्या पोलीस कमिशनरवर, तत्काली अंमलात असलेल्या विधी अन्वये आणि अनुसूची अन्वये सुधारणा केलेल्या ज्या अधिनियमांचा पोट-कलम (१) यात उल्लेख केला आहे त्या अधिनियमान्वये, त्याजकडे प्रदान केलेले अधिकार चालविले पाहिजेत व लादलेली कर्तव्ये पार पाडली पाहिजेत.

(३) राज्य शासनाला, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, पोलीस कमिशनरकडे प्रदान केलेले अधिकार त्याने चालविण्यावर किंवा त्याजवर लादलेली कर्तव्ये त्याने बजावण्यावर कोणत्याही शर्ती किंवा निर्बंध घालण्याच्या, किंवा यथास्थिति, ते काढून घेण्याच्या कारणासाठी, अनुसूचीतील कोणत्याही नोंदीत सुधारणा करण्याचा किंवा ती गाळून टाकण्याचा अधिकार आहे आणि अनुसूचीत त्याप्रमाणे सुधारणा केली पाहिजे.

(४) राज्य शासनाला, तत्काली अंमलात असलेल्या इतर कोणत्याही अधिनियमान्वये पोलीस कमिशनरकडे अधिकार प्रदान करण्याचा व कर्तव्ये लादण्याचा अधिकार आहे. आणि त्या कारणासाठी, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, त्या अधिनियमात, सुधारणा करून आवश्यक असलेली अनुकूलने व फेरफार ही अनुसूचीत दाखल करण्याचा किंवा निर्दिष्ट करण्याचा अधिकार आहे आणि त्यानंतर--

(क) अशा प्रत्येक अधिनियमाची त्याप्रमाणे सुधारणा केली पाहिजे आणि त्याचा अंमल, त्यात केलेली अनुकूलने व फेरफार यास अधीन असेल ; व

(ख) अधिनियमांची सुधारणा करण्यासाठी उक्त उपबंध अनुसूचीत समाविष्ट करून अनुसूचीची सुधारणा करण्यात आली आहे, असे समजण्यात आले पाहिजे.

(५) राज्य शासनाला, त्याच रीतीने, पोट-कलम (४) खालील अधिसूचना रद्द करण्याचा अधिकार आहे आणि त्यानंतर, संबंधित अधिनियम, रद्द केलेल्या अधिसूचनेद्वारे सुधारणा न केल्याप्रमाणे, अंमलात असेल आणि अनुसूचीची त्याप्रमाणे सुधारणा केली पाहिजे.

---

[1] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० याद्वारे हा भाग समाविष्ट करण्यात आला.

[1][पोलीस अधीक्षक] यांचे आणि जिल्हा फौजदारी न्यायाधिशाचे अधिकार, त्याऐवजी पोलीस कमिशनरकडे सोपविले असतील त्याबाबतीत, जिल्हा फौजदारी न्यायाधिशाने केलेल्या विद्यमान नेमणुका, अधिसूचना वगैरे पोलीस कमिशनरने केल्या आहेत असे समजणे.

४. कोणत्याही क्षेत्रासाठी पोलीस कमिशनरची नेमणूक करण्यात आल्यावर [पोलीस अधीक्षकाने] केलेली किंवा केली आहे असे समजण्यात येणारी कोणतीही नेमणूक, नियम, उपविधि, विनियम किंवा त्याने काढलेली किंवा काढली आहे असे समजण्यात येणारी कोणतीही अधिसूचना, किंवा त्याने दिलेला किंवा दिला आहे असे समजण्यात येणारा कोणताही आदेश, लायसन, लेख किंवा दस्तऐवज आणि या अधिनियमाच्या किंवा अनुसूचीतील कोणत्याही अधिनियमाच्या आधारे, जिल्हा फौजदारी न्यायाधिशाचे कोणतेही अधिकार त्याऐवजी पोलीस कमिशनरवर सोपविण्यात आले असतील आणि त्याची कर्तव्ये त्याऐवजी पोलीस कमिशनरवर लादण्यात आली असतील अशा बाबतीत, जिल्हा फौजदारी न्यायाधिशाने केलेली किंवा केली आहे असे समजण्यात येणारी कोणतीही नेमणूक, नियम, उपविधि, विनियम किंवा त्याने काढलेली किंवा काढली आहे असे समजण्यात येणारी कोणतीही अधिसूचना किंवा त्याने दिलेला किंवा दिला आहे असे समजण्यात येणारा कोणताही आदेश, लायसन, लेख किंवा दस्तऐवज ही, पोलीस कमिशनरने केलेली, काढलेली किंवा दिलेली आहे असे समजले पाहिजे आणि ती पोलीस कमिशनरकडून रद्द करण्यात न आल्यास आणि रद्द करण्यात येईपर्यंत किंवा त्याजकडून तीत फेरफार करण्यात न आल्यास आणि फेरफार करण्यात येईपर्यंत अंमलात राहील.

विद्यमान विधीतील [1][पोलीस अधीक्षकाच्या] उल्लेखांचा अर्थ लावणे.

५. अनुसूचीत केलेल्या उपबंधास अधीन राहून, कोणत्याही क्षेत्रासाठी पोलीस कमिशनर नेमण्यात येईल तेव्हा, सर्व विद्यमान विधीचा अर्थ, संदर्भावरून त्यांचा अन्यथा अर्थ लावणे आवश्यक नसेल तर, जणू काही त्यात [1][पोलीस अधीक्षकांकडे] केलेले उल्लेख, हे पोलीस कमिशनरकडे केलेले उल्लेख आहेत असे समजून, त्याप्रमाणे त्यांचा अर्थ लावला पाहिजे.

लेखातील किंवा कागदपत्रातील जिल्हा पोलीस अधीक्षकाच्या व जिल्हा फौजदारी न्यायाधिशाच्या उल्लेखाचा अर्थ लावणे.

६. कोणत्याही क्षेत्रासाठी पोलीस कमिशनरची नेमणूक करण्यात येण्यापूर्वी, कोणताही विद्यमान विधि किंवा अनुसूचीत निर्दिष्ट केलेला कोणताही अधिनियम याअन्वये किंवा त्यास अनुलक्षून करून दिलेल्या सर्व लेखांचा किंवा कागदपत्रांचा अर्थ, संदर्भावरून त्यांचा अन्यथा अर्थ लावणे आवश्यक नसेल तर, जणू त्यातील [1][पोलीस अधीक्षकाचे] उल्लेख अथवा या अधिनियमाच्या आधारे किंवा अनुसूचीतील कोणत्याही अधिनियमाच्या आधारे जिल्हा फौजदारी न्यायाधिशाचे कोणतेही अधिकार त्याऐवजी पोलीस कमिशनरकडे सोपविले असतील किंवा जिल्हा फौजदारी न्यायाधिशाची कोणतीही कर्तव्ये त्याऐवजी पोलीस कमिशनरवर लादली असतील त्या बाबतीत, जिल्हा फौजदारी न्यायाधिशाचे उल्लेख, जणू ते त्या प्रदेशाच्या पोलीस कमिशनरकडे केलेले उल्लेख आहेत, असे समजून त्याप्रमाणे त्यांचा अर्थ लावण्यात आला पाहिजे.

[1][पोलीस अधीक्षक] व जिल्हा फौजदारी न्यायाधीश यांजपुढील अनिर्णीत कामकाज.

७. कोणत्याही विद्यमान विधि अन्वये [1][पोलीस अधीक्षक] यांजपुढे अथवा या अधिनियमाच्या आधारे किंवा अनुसूचीतील कोणत्याही अधिनियमाच्या आधारे जिल्हा फौजदारी न्यायाधिशाचे कोणतेही अधिकार व कर्तव्ये त्याऐवजी पोलीस कमिशनरवर सोपविले असतील त्या बाबतीत, जिल्हा फौजदारी न्यायाधिशापुढे त्या क्षेत्रासाठी पोलीस कमिशनरची नेमणूक केल्याच्या तारखेच्या निकटपूर्वी अनिर्णीत असलेले कामकाज तसेच अपिले, फेरतपासणी किंवा पुनर्विलोकन याबाबतचे कामकाज विधीनुसार निकालात काढण्यासाठी त्या क्षेत्राच्या पोलीस कमिशनरकडे वर्ग केले पाहिजे.

---

[1] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम ३ अनुसूची याद्वारे "जिल्हा पोलीस अधीक्षक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

अनिर्णीत असलेले वैध कामकाज. ८. ज्या तारखेस कोणत्याही क्षेत्रासाठी पोलीस कमिशनरची नेमणूक करण्यात येईल त्या तारखेस, [1][पोलीस अधीक्षक] हा ज्यात पक्षकार असेल असे किंवा या अधिनियमाच्या आधारे किंवा अनुसूचीतील कोणत्याही अधिनियमाच्या आधारे जिल्हा फौजदारी न्यायाधिशाचे कोणतेही अधिकार त्याऐवजी पोलीस कमिशनरकडे सोपविले असतील किंवा जिल्हा फौजदारी न्यायाधिशाची कोणतीही कर्तव्ये त्याऐवजी पोलीस कमिशनरवर लादली असतील त्याबाबतीत, जिल्हा फौजदारी न्यायाधीश हा ज्यांत पक्षकार असेल असे कोणतेही वैध कामकाज अनिर्णीत असेल तर, उक्त कामकाजात [1][पोलीस अधीक्षक] किंवा यथास्थिति, जिल्हा फौजदारी न्यायाधीश याऐवजी पोलीस कमिशनर दाखल करण्यात यावा.

अडचणी निवारण करण्याचा अधिकार. ९. जर या अधिनियमाच्या उपबंधाची अंमलबजावणी करताना, कोणतीही अडचण उपस्थित होईल तर, राज्य शासनाला, आदेशाद्वारे, अडचण दूर करण्याच्या कारणासाठी आवश्यक किंवा इष्ट वाटेल असे अशा उपबंधांशी विसंगत नसणारे कोणतेही कृत्य करण्याचा अधिकार आहे.

## अनुसूची

(कलम ३ पहा)

| १ | २ |
|---|---|
| मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ (सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २२) | १. कलम २ चा खंड (५) मध्ये "बृहन्मुंबईचा" या शब्दाऐवजी "कलम ७ अन्वये ज्या क्षेत्रासाठी पोलीस कमिशनर याची नेमणूक करण्यात आली आहे त्या कोणत्याही क्षेत्राचा" हे शब्द दाखल करण्यात यावेत.<br>२. कलम ११ मध्ये--<br>(क) पोट-कलम (१) यात "बृहन्मुंबईसाठी" या शब्दाऐवजी "कलम ७ अन्वये ज्या क्षेत्रासाठी पोलीस कमिशनर याची नेमणूक करण्यात आली आहे त्या कोणत्याही क्षेत्रासाठी" हा मजकूर दाखल करण्यात यावा.<br>(ख) समास टीपेऐवजी पुढील समास टीप दाखल करण्यात यावी :--<br>"कमिशनरांच्या क्षेत्राधिकाराखाली असलेले अधीक्षक".<br>३. कलम १२, पोट-कलम (१) मध्ये--<br>(क) "बृहन्मुंबईचे" याऐवजी "कोणत्याही क्षेत्राचे" हा मजकूर दाखल करावा ;<br>(ख) "बृहन्मुंबईत" या शब्दाऐवजी "कमिशनरच्या कार्यक्षेत्रात असलेल्या प्रदेशात" हा मजकूर दाखल करावा.<br>४. कलम ३३, पोट-कलम (४) मध्ये--<br>"बृहन्मुंबईबाहेरील कोणत्याही क्षेत्रासंबंधाने" याऐवजी "कमिशनरच्या कार्यक्षेत्रात असलेल्या कोणत्याही क्षेत्रासंबंधाने" हा मजकूर दाखल करण्यात यावा. |

[1] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम ३ अनुसूची याद्वारे "जिल्हा पोलीस अधीक्षक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

अनुसूची--चालू

| १ | २ |
|---|---|
| | ५. कलम ६३ अअ, पोट-कलम (१) मध्ये-- "बृहन्मुंबईत" या शब्दाऐवजी "ज्या क्षेत्रासाठी कमिशनरची नेमणूक करण्यात आली आहे त्या कोणत्याही क्षेत्रात" हा मजकूर दाखल करावा. |
| | ६. कलम ८२, पोट-कलम (२) मध्ये-- "बृहन्मुंबईत" या शब्दाऐवजी "ज्या क्षेत्रासाठी कमिशनरची नेमणूक करण्यात आली आहे अशा कोणत्याही क्षेत्रात" हा मजकूर दाखल करावा. |
| | ७. कलम ८३ मध्ये-- |
| | (क) पोट-कलम (१) मध्ये "बृहन्मुंबईत" या शब्दाऐवजी "कमिशनरच्या कार्यक्षेत्रात असलेल्या कोणत्याही क्षेत्रात" हा मजकूर दाखल करावा. |
| | (ख) पोट-कलम (२) मध्ये "बृहन्मुंबईबाहेरील क्षेत्रात" या मजकुराऐवजी "कमिशनरच्या कार्यक्षेत्राबाहेरील प्रदेशात" हा मजकूर दाखल करावा. |
| | ८. कलम ८९ मध्ये "बृहन्मुंबईबाहेरील कोणत्याही क्षेत्रात" या मजकुराऐवजी "कमिशनरच्या कार्यक्षेत्राबाहेरील कोणत्याही क्षेत्रात" हा मजकूर दाखल करावा. |
| | ९. कलम ९०, पोट-कलम (१) मध्ये "बृहन्मुंबईत" या शब्दाऐवजी "कमिशनराच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही क्षेत्रात" हा मजकूर दाखल करावा. |
| | १०. कलम ९०-अ, पोट-कलम (१) मध्ये-- "बृहन्मुंबईत" या शब्दाऐवजी "कमिशनरच्या कार्यक्षेत्रात असलेल्या कोणत्याही क्षेत्रात" हा मजकूर दाखल करावा. |
| | ११. कलम ९१ मध्ये "बृहन्मुंबईत" या शब्दाऐवजी " कमिशनरच्या कार्यक्षेत्रात असलेल्या कोणत्याही क्षेत्रात" हा मजकूर दाखल करावा. |
| | १२. कलम ९५, पोट-कलम (१) मध्ये--"बृहन्मुंबईत" या शब्दाऐवजी "कमिशनरच्या कार्यक्षेत्रात असलेल्या कोणत्याही क्षेत्रात" हा मजकूर दाखल करावा. |
| | १३. कलम ९६ मध्ये-- |
| | (क) पोट-कलम (१), खंड (१) मध्ये "बृहन्मुंबईत" या शब्दाऐवजी "कमिशनराच्या कार्यक्षेत्रात असलेल्या कोणत्याही क्षेत्रात" हा मजकूर दाखल करावा. |

अनुसूची--चालू

| १ | २ |
|---|---|
| | (ख) पोट-कलम (२) मध्ये "बृहन्मुंबईत" या शब्दाऐवजी "कमिशनरच्या कार्यक्षेत्रात असलेल्या कोणत्याही क्षेत्रात" हा मजकूर दाखल करावा. |
| | (ग) पोट-कलम (३) मध्ये "बृहन्मुंबईस" या शब्दानंतर "आणि ज्या क्षेत्रासाठी कमिशनर याची नेमणूक करण्यात आली असेल अशा कोणत्याही क्षेत्रास" हा मजकूर दाखल करावा. |
| | १४. कलम ११९ मध्ये "बृहन्मुंबईबाहेरील" या शब्दानंतर "ज्या क्षेत्रासाठी कमिशनर याची नेमणूक करण्यात आली नाही अशा कोणत्याही क्षेत्राबाहेरील" हा मजकूर दाखल करावा. |
| | १५. अनुसूची २ मध्ये "बृहन्मुंबईत" या शब्दाऐवजी पुढील मजकूर दाखल करावा :-- "बृहन्मुंबईत ................................... कमिशनरच्या कार्य-क्षेत्रातील प्रदेशात". |
| दंड प्रक्रिया संहिता, १८९८ (सन १८९८ चा ५ वा). | १. कलम ८३, पोट-कलम (१) मध्ये "इलाखा शहरातील" हे शब्द गाळण्यात यावे. |
| | २. कलम ८५ मध्ये "इलाखा शहरातील" हे शब्द गाळण्यात यावे. |
| | ३. कलम ३७३ ला पुढील परंतुक जोडण्यात यावे :-- "तसेच ज्या क्षेत्रासाठी पोलीस कमिशनर याची नेमणूक करण्यात आली असेल अशा बृहन्मुंबईबाहेरील कोणत्याही क्षेत्रात जर कामकाज सुरू करण्यात आले असेल तर सेशन न्यायालयाने अशी प्रत उक्त क्षेत्राच्या पोलीस कमिशनरकडे पाठविली पाहिजे." |
| मुंबई जुगार खेळण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १८८७ (सन १८८७ चा मुंबई अधिनियम क्र. ४) | १. कलम ६, खंड (१) मधील "बृहन्मुंबईतील" या मजकुराऐवजी "ज्या क्षेत्रासाठी पोलीस कमिशनर याची नेमणूक करण्यात आली असेल अशा कोणत्याही क्षेत्रातील" हा मजकूर दाखल करण्यात यावा. |
| | २. कलम ११ मधील, "बृहन्मुंबईतील" या मजकुराऐवजी "ज्या क्षेत्रासाठी पोलीस कमिशनरची नेमणूक करण्यात आली असेल अशा कोणत्याही क्षेत्रातील" हा मजकूर दाखल करण्यात यावा. |

| १ | २ |
| --- | --- |
| मुंबई सार्वजनिक वाहनांबाबत अधिनियम, १९२० (सन १९२० चा मुंबई अधिनियम क्र. ७) | १. कलम २ यातील खंड (अ) ऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात यावा :--<br>(क) "पोलीस कमिशनर" या संज्ञेचा अर्थ,--<br>(१) बृहन्मुंबईसाठी असलेला पोलीस कमिशनर, आणि<br>(२) उर्वरित अधिनियम किंवा त्याचा कोणताही भाग इतर कोणत्याही क्षेत्रास लागू करण्यात आला असेल आणि त्या क्षेत्रासाठी पोलीस कमिशनर याची नेमणूक करण्यात आली असेल त्याबाबतीत, उक्त क्षेत्रासाठी असलेला पोलीस कमिशनर, असा समजावा ;<br>आणि तीत संबंधित पोलीस कमिशनरने, या अधिनियमान्वये त्याजवर लादण्यात आलेली कर्तव्ये पार पाडण्यासाठी किंवा त्यास दिलेले अधिकार चालविण्यासाठी त्याने ज्या कोणत्याही व्यक्तीस अधिकृत केले असेल त्या व्यक्तीचा समावेश होतो ;<br>२. कलम ३६, पोट-कलम (२), खंड (अ) मधील "कमिशनरने" या शब्दानंतर "पोलीस कमिशनरची नेमणूक करण्यात आली नसेल त्याबाबतीत" हा मजकूर दाखल करण्यात यावा. |
| मुंबई करमणूक कर अधिनियम, १९२३ (सन १९२३ चा मुंबई अधिनियम क्र. १) | १. कलम ६, पोट-कलम (१) मधील, "बृहन्मुंबईत" या शब्दाऐवजी "ज्या क्षेत्रासाठी पोलीस कमिशनरची नेमणूक करण्यात आली असेल अशा कोणत्याही क्षेत्रात" हा मजकूर दाखल करण्यात यावा.<br>२. कलम ८, पोट-कलम (१) मधील "बृहन्मुंबईत" या शब्दाऐवजी "ज्या क्षेत्रासाठी पोलीस कमिशनरची नेमणूक करण्यात आली असेल अशा कोणत्याही क्षेत्रात" हा मजकूर दाखल करण्यात यावा. |
| मुंबईचा भिकाऱ्यांबाबत अधिनियम, १९४५ (सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्र. २३) | कलम २८, पोट-कलम (१) मधील "बृहन्मुंबईत" या शब्दाऐवजी "ज्या क्षेत्रासाठी पोलीस कमिशनरची नेमणूक करण्यात आली असेल अशा कोणत्याही क्षेत्रात" हा मजकूर दाखल करण्यात यावा. |
| मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्र. ५९) | कलम २३४ मधील, "जिल्हा फौजदारी न्यायाधिशाच्या" या शब्दांनी सुरू होणाऱ्या व "अधिकाऱ्याच्या अनुमतीने" या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात यावा. |

अनुसूची--समाप्त

| १ | २ |
|---|---|
| | "ज्या क्षेत्रासाठी पोलीस कमिशनरची नेमणूक करण्यात आली असेल अशा कोणत्याही क्षेत्रात पोलीस कमिशनरच्या किंवा त्याने नेमलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याच्या आणि इतर ठिकाणी जिल्हा फौजदारी न्यायाधिशाच्या किंवा त्याने नेमलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या अनुमतीने". |
| भारताचा वेड लागलेल्या इसमाबाबत अधिनियम, १९१२ (सन १९१२ चा क्र. ४) | कलम १७ मधील-- (क) "प्रेसिडेन्सी शहरात" या मजकुराऐवजी "ज्या क्षेत्रासाठी पोलीस कमिशनरची नेमणूक करण्यात आली असेल अशा क्षेत्रात" हा मजकूर दाखल करण्यात यावा ; (ख) "प्रेसिडेन्सी शहरापैकी कोणत्याही शहरात" या मजकुराऐवजी, "उक्त क्षेत्रांपैकी कोणत्याही क्षेत्रात" हा मजकूर दाखल करण्यात यावा ; (ग) समास टीपेतील "प्रेसिडेन्सी शहरात" या मजकुराऐवजी, "त्याचे अधिकाराखालील क्षेत्रात" हा मजकूर दाखल करण्यात यावा. |
| कैद्यांची ओळख पटविण्याबाबत अधिनियम, १९२० (सन १९२० चा क्र. ३३) | कलम ७ मधील "बृहन्मुंबईत" या मजकुराऐवजी, "ज्या क्षेत्रासाठी पोलीस कमिशनरची नेमणूक करण्यात आली असेल अशा कोणत्याही क्षेत्रात" हा मजकूर दाखल करण्यात यावा. |
| पोलीस (असंतोष भडकविणे) अधिनियम, १९२२ (सन १९२२ चा २२ वा) | कलम ५ मधील, "इलाखा शहराच्या बाबतीत" या शब्दानंतर "किंवा पोलीस कमिशनरच्या कार्यक्षेत्रात असलेल्या कोणत्याही क्षेत्राच्या बाबतीत" हे शब्द दाखल करण्यात यावेत. |
| लाचलुचपत प्रतिबंध अधिनियम, १९४७ (सन १९४७ चा २ रा) | कलम ५-अ, खंड (ब) मधील "मुंबई प्रेसिडेन्सी शहर" या मजकुरानंतर "आणि ज्या क्षेत्रासाठी पोलीस कमिशनरची नेमणूक करण्यात आली असेल असे इतर कोणतेही क्षेत्र" हा मजकूर दाखल करण्यात यावा. |

एच ६१-६०८२ पु.-११.२००६

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर